महामंडलेश्वर
स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे

**सत्संग - प्रवचन**

# नाम जपाने मुक्ती



***(प्रथम आवृत्ती)***

- प्रकाशक -
ॐ परमानंद प्रकाशन
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**
भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)
दूरध्वनी :

किंमत : दहा रुपये (१०/-)

# निवेदन

नाम जपाने मुक्ती ! स्वामिजींच्या सानिध्यात जे सात दिवसांचे अनुष्ठान साधक करतात. त्या अनुष्ठान काळातील चौथ्या दिवसाचे हे स्वामीजींच्या मुखातील प्रवचन  प्रत्येकाने वाचले पाहिजे, त्याचे मनन, चिंतन केले पाहिजे.

सत्य युगामध्ये ध्यानाने, त्रेतायुगामध्ये यज्ञाने, द्वापार युगामध्ये पूजनाने तर पापमय अशा कलियुगामध्ये नाम - जपाने सहज भगवंताची प्राप्ती होते.

नाम जपाने प्राणी पुण्यात्मा व पुण्यात्मा परमात्मामय होतो. अनेकांचा उद्धार या युगामध्ये नाम जपाने झालेला आहे.होत आहे व होत राहील. म्हणून नेहमी सोपे साधे परंतु महान लाभकारी असे भगवंताचे नाम जपले पाहिजे.

शास्त्र प्रचिती, गुरू प्रचिती व आत्म प्रचितीने स्वामीजी सांगतात आपल्या सर्व ईच्छा पूर्ण होण्यासाठी व अंतिम मोक्ष प्रात्प होण्यासाठी नाम प्रत्येकाने जपले पाहिजे.

स्वामीजींनी स्वतः अनेक तीर्थक्षेत्रात अनुष्ठान केले. मंत्र सिद्धी मिळविली मंत्राचा अनुभव घेतला. तो मंत्राचा, नामाचा अनुभव आपण देखील घ्यावा. यासाठी नाम महिमा आपणास कळावा या सद्हेतूने हे पुस्तकरुपी प्रवचन आपल्या हाती देतांना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

प्रकाशक



**आपुले कल्याण इच्छिने जयासी ।तेणे या नामासी विसरू नये ।।१।।**
**करील मनीचे परिपूर्ण हेत । पाहिजे हे चित्त नामापासी ।।२।।**
**भुक्ती आणि मुक्ती जोडतिल सिद्धी । होईल गा बुद्धी अपरिमीत ।।३।।**
**बहेणी म्हणे पाहा जपोनिया नाम ।पुरविल काम जो जो हेत ।।४।।**

◆ ◆ ◆

हा जो चार चरणाचा अभंग आहे. या अभंगाच्या पहिल्या चरणामध्ये उपदेश केलेला आहे की, ज्यांना आपल्या कल्याणाची इच्छा असेल त्यांनी कधीही नामाला विसरू नये. जो नेहमी नाम स्मरण करतो त्याचे कल्याण होते. दुसऱ्या आणि तिसऱ्या चरणामध्ये नामस्मरणाचा महिमा सांगितलेला आहे की, ज्याचे चित्त नेहमी नामाच्या जवळ असेल त्याच्या संपूर्ण इच्छा पूर्ण होतात. एवढेच नव्हे तर भुक्ती, मुक्ती, सिद्धी आणि अपरिमीत बुद्धीची त्याला प्राप्ती होते. अंतिम चरणामध्ये स्वतः अनुभव घ्यायला सांगितलेला आहे की, आपण नाम जपून बघा. नाम जपल्याने आपली देखील जी इच्छा कामना असेल ती पूर्ण होऊन जाईल.

थोडक्यात असे सांगता येईल की नामस्मरणाने, चिंतनाने सर्व शुभ चांगल्या ईच्छा पूर्ण होऊन जातात. आणि अंती मोक्ष प्राप्त होतो. म्हणजेच या संसारामध्ये सुख आणि परलोकामध्ये सद्गती देणार नाम आहे.

हे जाणल्यानंतर मनामध्ये काही प्रश्न निर्माण होऊ शकतात. जसे - काय याच तऱ्हेने इतर संतानी देखील नामाची महिमा सांगितलेली आहे? नाम जपल्याने काय खरोखरच मुक्ती मिळू शकते? जर मिळू शकते तर नाम कसे जपायला पाहिजे ? इत्यादी....

या प्रश्नाच्या उत्तरासाठी नामाच्या महिम्याच्या संदर्भात संत नामदेव महाराज म्हणतात...

**नामाचा महिमा कोण जाणे सीमा । चतुर्मूख ब्रह्मा नेणे काही**

नामाचा जो महिमा आहे, त्या नामाचा महिमा किंवा सीमा एवढीच मर्यादित आहे. असे म्हणू शकत नाही. कारण की नामाचा महिमा खूप अगाध आहे. ज्या ब्रह्मदेवाला चार मूख आहे.ते ब्रह्मदेव एकाच वेळेस चार मुखाने वर्णन करायला लागले तरी देखील नामाची संपूर्ण महिमा ते वर्णन करू शकत नाही. याचा एक अर्थ हा ही होऊ शकतो की, ब्रह्मदेवाला सृष्टी वाढविण्याची चिंता असल्यामुळे ते संपूर्ण नामाचा महिमा जाणू शकत नाही. कारण की, ज्यांना संसाराची चिंता असते ते नामाचा महिमा जाणू शकत नाही. नामाचा महिमा तर तेच जाणतात की जे रात्रंदिवस संसाराची चिंता सोडून भगवंताचे चिंतन करतात. नामाच्या महिम्याची सीमा, ब्रह्मदेव जाणत नाही याचा अर्थ हा नाही की, नामाचा महिमा कुणीच जाणत नाही.
नामाचा जो महिमा आहे त्या संदर्भात संत तुकाराम महाराज म्हणतात...

**नाम आहे जयापासी । जेथे राहे तेथे काशी ।।**
**ऐसा नामाचा महिमा । जाणे वाल्मिक शंकर उमा ।।**
**नाम जाणे हनुमंत । जाणताती महासंत ।।**
**नाम जाणे तुका । नाही संसाराचा धोका ।।**

या अभंगामध्ये संत तुकाराम महाराज नामाचा महिमा सांगतांना म्हणतात की, ज्याच्याजवळ नाम असेल, जो रात्रंदिवस नामस्मरण करत असेल, चिंता सोडून जो रात्रंदिवस भगवंताचे चिंतन करत असेल, असा भक्त, संत जेथे राहत असेल तेथे काशीचा महिमा प्राप्त होतो.



जसे ग्रंथामध्ये वर्णन येते की, काशीमध्ये ज्याचा मृत्यू होतो त्याची मुक्ती होते. म्हणून मराठीत एक म्हण आहे की,

**''मरावे एक तर काशीत, नाही तर आपल्याच वेशित''**

एक तर काशीत मरायला पाहिजे नाहीतर आपल्याच गावच्या वेशित म्हणजे घरात मरायला पाहिजे. मद्य आदि व्यसनांचे सेवन करून कुत्र्याची किंवा पशुमौत ज्याला म्हणतात असे मरण येऊ नये. भगवंताचे स्मरण, चिंतन करत, ध्यान करत, आपल्या घरात, आश्रमात, मंदिरात, कुटियात मेले पाहिजे. ज्यामुळे त्याची मुक्ती होऊन जाते. काशीमध्ये मरण्याचा लाभ त्याला त्याच ठिकाणी प्राप्त होतो. ज्या ठिकाणी तो नामस्मरण करत राहतो.

अशा प्रकारे भक्ती, शक्ती, मुक्ती, देणारे नाम कोण जाणतो? तर म्हणतात...

**ऐसा नामाचा महिमा । जाणे वाल्मिक शंकर उमा ।।**

नामाचा महिमा जाणनाऱ्यामध्ये सर्वांत पहिले संत तुकाराम महाराजांनी वाल्या कोळ्याचे नाव घेतले. येथे एक शंका निर्माण होऊ शकते की, भगवान शंकर आणि उमा म्हणजे पार्वतीच्या पहिले संत तुकाराम महाराजांनी नामाची महिमा जाणनाऱ्यामध्ये सर्वात पहिले वाल्या कोळ्याचे नाव का घेतले? आणि वाल्या कोळ्याने असे काय केले की ज्याला नामाचा महिमा कळाला?

पुराणामध्ये वाल्या कोळ्याची कथा येते की, जो एक महान लुटेराच नव्हे तर एक महान हत्यारा देखील होता. असे म्हणतात की त्याने किती हत्या केल्या याचा हिशोब करण्यासाठी त्याने एका

मोठ्या हत्येसाठी लहान लहान खडे टाकून सात मोठ मोठे रांजण भरले होते. इतर अनेक लहान हत्या तर तो नित्य करत होता. ज्यांची कधी त्याने गिणती केली नाही. एक दिवस नारदमुनी आले त्यांना तो लुटण्यासाठी गेला मोठ्या आवाजात तो म्हणाला, जे काय तुझ्याजवळ असेल ते सर्व खाली ठेवून दे अन्यथा या खड्गाने तुझे शिर धडापासून वेगळे होईल. असा त्याने मोठ्या आवाजात आदेश तर दिला; परंतु जीवनामध्ये पहिल्याच वेळेस त्याला आश्चर्याचा धक्का बसला. कारण आजपर्यंतचा त्याचा अनुभव होता की, केवळ त्याला पाहिल्यानंतर बरेचसे आपला प्राण त्यागत होते. परंतु नारदमुनी निर्भय होते. कारण की, सत्संग प्रवचन सुरू होण्यापूर्वीच आपणास सांगितले होते की...

**''भैनाशन दुरमती हरण कलिमें हरि को नाम ''**

जो नामस्मरण करतो तो निर्भय होतो. नारदमुनी नेहमी नारायण नाम जपत असल्यामुळे निर्भय बनलेले होते. नारदमुनीवर त्याच्या आदेशाचा काहीच प्रभाव पडला नाही. उलट नारद मुनीनेच त्याला विचारले, बेट्या वाल्या! तू जे हे सर्व महान पाप करतो ते कशासाठी? वाल्याकोळ्याने लगेच उत्तर दिले, जसे आताचे लोक उत्तर देतात तसे तो म्हणाला मी हे सर्व माझ्यासाठी थोडेच करतो? माझ्या कुटुंबासाठी करतो, माझ्यासाठी नाही. नारदमुनीने परत विचारले, तू जे हे पाप कुटुंबासाठी करतो तर काय तुझे कुटुंबीजण तुझ्या पापाचे वाटेकरी होतील ? तो म्हणाला ... का होणार नाही, मी हे सर्व त्यांच्या साठीच तर करतो...

नारदमुनी म्हणाले, असे होऊ शकत नाही कारण की



**'' जो करील तो भरील ''** अशी म्हण आहे.'' **जिसका पाप वही भोगता अपनेआप ''** अशीही एक म्हण आहे. हे देखील बघितल्या जाते की, ज्याचा हात मोडतो तो त्याच्याच गळ्यात बांधल्या जातो. त्याचे दुःख त्यालाच भोगावे लागते. या प्रमाणे तुझे पाप तुलाच भोगावे लागेल. परंतु वाल्हया कोळी वादविवाद घालायला लागला.शेवटी नारदमुनीने सांगितले म्हणून तो आपल्या घरी गेला आणि सर्वांना विचारले की, मी जे आपल्यासाठी पाप केलेले आहे त्या पापाचे आपण वाटेकरी व्हाल किंवा नाही? त्या वेळेस सर्वांनी सांगितले की, आम्ही आपल्या पापाचे वाटेकरी होणार नाही. तेव्हा त्याला अजून एक आश्चर्याचा धक्का बसला की, मी यांच्यासाठी इतके पाप केले परंतु कोणीच माझ्या पापाचे वाटेकरी होण्यास तयार नाही. आपण केलेल्या पापाबद्दल आता त्याच्या मनात पश्चाताप निर्माण झाला. तो परत नारदमुनीजवळ आला आणि अत्यंत दिनवाणीने त्याने पापापासून मुक्त होण्याचा उपाय विचारला तेव्हा नारदमुनीने सांगितले, वाल्या सर्वांत पहिले तू पापकर्म करणे सोडून दे. दुसरी गोष्ट ही आहे की, तू जे आतापर्यंत महान पाप केले त्यापासून निवृत्त होण्यासाठी मी तुला मंत्र देतो. त्या मंत्राचा, नामाचा जप करण्यासाठी तू येथे अनुष्ठान करण्यासाठी बस. त्याने स्वीकार केले नारदमुनीने त्याला राम मंत्र दिला आणि त्या मंत्राचा उच्चार करण्यास सांगितले. परंतु त्याच्या मुखातून राम मंत्राचा उच्चार येण्याऐवजी म्हणजे राम राम म्हणण्या ऐवजी सवयी मुळे मरा मरा म्हणावयास लागला. अशा प्रकारे तो मरा मरा उच्चार करत तेथेच बसला. तो खाणे, पिणे, झोपणे सर्व विसरून गेला. तो दिवस गेला, आठवडे, महिने, कित्येक वर्ष चालल्या गेले. परंतु तो उठला नाही. जोपर्यंत गुरु आदेश देत नाही तोपर्यंत उठायचे नाही असा मनोमन त्याने संकल्प केला.

नारदमुनी तर मंत्र देऊन गेले होते. तो तेथे मरा मरा चा जप करत बसला. मरा मरा जपता जपता केव्हा त्याच्या मुखात राम राम मंत्र आला त्यालाही कळले नाही. काही वर्षानंतर नारदमुनी परत तेथे आले तेव्हा त्यांनी बघितले की, तेथे एक मोठे वारूळ तयार झालेले आहे. त्यातून राम मंत्राचा आवाज येत आहे. त्यात अस्थिपंजर वाल्हया तप करत होता. नारदमुनीने त्याला आवाज दिला, तर त्या वारुळातून वाल्याचा वाल्मिक ऋषी होऊन बाहेर आला. जे ब्रम्ह समान पवित्र झाले होते. पाप, ताप सर्व समाप्त झाले होते. पापापासून महान पुण्यात्मा मध्ये त्यांचे परिवर्तन झाले होते. म्हणून म्हणतात...

**करमनासू जलू सुरसरी परई। तेही को कहहू सीस नही धरई ।**
**उलटा नामू जपत जगू जाना । बालमिकी भए ब्रह्म समाना ।।**

वाल्हया कोळी जो महान पापी होता. ज्याच्या मुखातून राम राम शब्द देखील निघत नव्हता. ज्याने त्याचा उलटा जप केला. तरी त्याची सद्गती झाली. महान पुण्यात्मा ब्रह्मसमान ऋषी झाले. पुण्यात्मा तर नामाचा जप करतात आणि पुण्यात्म्यांना तर थोडी बहूत नाममहिम्याची कल्पना असते. परंतु महान पापात्म्यापासून महान पुण्यात्मा ते नामामुळे झाले म्हणून सर्वांत पहिले वाल्मिकाचे नाव तुकाराम महाराजांनी घेतले ते योग्यच म्हणावे लागेल.

नामाचा महिमा जाणनाऱ्यामध्ये दुसरे उदाहरण भगवान शंकराचे दिलेले आहे. जे देवांचे देव महादेव आहे आणि सर्व सिद्धांचे आदि गुरु आहे. आदिनाथ गुरू सकळ सिद्धांचा असे ज्यांचे वर्णन येते. गुरुनानकदेव म्हणतात की.....



**भैनाशन दुर्मती हरण कलीमे हरि को नाम ।**
**निशिदीन नानक जो जपै सफल होई तीह काम ।।**

जो भगवंताचे नाम जपतो त्याच्या दुष्ट बुद्धीचा नाश होतो आणि दुर्मतीचा किंवा दुष्ट बुद्धीचा नाश झाल्यामुळे जे दुष्कर्म होते आणि दुष्कर्मामुळे जीवाला जे भय होते ते नाम जपल्याने होत नाही. म्हणजेच नाम जपल्याने दुर्मती आणि भयाचा नाश होतो. एवढेच नव्हे तर जो रात्रंदिवस नामस्मरण करतो म्हणजेच नाम जपतो तर त्याचे सर्व कार्य सफल होते. संत बहिणाबाई देखील अभंगाच्या अंतिम चरणामध्ये म्हणते की...

**बहेणी म्हणे पाहा जपोनिया नाम । पुरविल काम जो जो हेत ।।**

नाम जपल्याने मनामध्ये जी जी इच्छा असेल ती पूर्ण होऊन जाते.

म्हणून बरेचसे मनामध्ये काही ना काही कामना ठेऊन नाम जपतात. मनामध्ये कामना ठेऊन जप करणाऱ्यांची विशेषता आहे असे नाही. विशेष विशेषता तर त्यांची आहे की, ज्यांच्या मनामध्ये काहीच कामना नाही तरी देखील ते नामस्मरण करतात. अशा निष्काम भावनेने नाम जपणाऱ्यामध्ये भगवान शंकर आहे.. म्हणून संत तुकाराम महाराजांनी नामाची महिमा जाणणाऱ्यामध्ये, भगवान शंकराचे उदाहरण दिले. संत रामदास स्वामी देखील म्हणतात.

**जेणे जाळीला काम तो राम ध्यातो। उमेसी अति आदरे गुन गातो ।**
**बहू ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथे । परि अंतरी नाम विश्वास तेथे ।।**

भगवान शंकराने कामाला जाळले. त्यांच्या मनात कसल्याच प्रकारची कामना नाही ते निष्काम आहे. तरी देखील ते नामस्मरण करतात. एवढेच नव्हे तर स्वतः नाम जपून आपली अर्धांगी उमेला म्हणजेच पार्वतीला देखील नामाचा महिमा सांगतात.ते अज्ञानी आहे कामासक्त आहे, निर्बल आहे असे नाही, त्यांच्या मस्तकातून रात्रंदिवस ज्ञानगंगा वाहत राहते. वैराग्य तर ऐवढे आहे की, रात्रंदिवस स्मशानामध्ये राहतात आणि सामर्थ्य तर इतके आहे कि, ज्यांच्या केवळ संकल्पाने करोडो ब्रह्मांड निर्माण होतात आणि लय देखील पावतात. तरी देखील त्यांचा नामावर विश्वास आहे.

नाम सर्वांनी जपले पाहिजे. नामाचा महिमा सर्वांनी जाणला पाहिजे. म्हणून ते नेहमी लीला देखील करत राहतात. जसे नामाची महिमा जगाला समजावण्यासाठी त्यांची हलाहल विषपान लीला आहे.

देव, दानवांनी मिळून समुद्रमंथन केले त्यामधून जे रत्न निघाले ते देवतांनी घेतले. जसे ऐरावत हत्ती निघाला तो इंद्राने घेतला. लक्ष्मी निघाली ती विष्णूने घेतली. परंतु ज्या वेळेस हलाहल विष निघाले तर सर्व पळायला लागले. जगाला वाचविण्यासाठी देवतांची विनंती स्वीकारून भगवान शंकर तेथे आले आणि त्यांनी ते हलाहल विष आपल्या कंठामध्ये साठविले. त्यामुळे त्यांचा कंठ निळा झाला. ते नीलकंठ नावाने प्रसिद्ध झाले. नामाचा महिमा दाखविण्यासाठी त्यांनी सामर्थ्य असतांना देखील जगाला दाखविले की शीतल चंद्रमा, शीतल गंगा, बेलपत्र धारण करून जो लाभ झाला नाही. तो नाम जपाने झाला. जसे समर्थ रामदास स्वामी म्हणतात...

**बहुनाम या रामनामी तुळेना । अभाग्या नरा पामरा हे कळेना ।**
**विषा औषध घेतले पार्वतीशे । जीवा मान किंकरा कोण पुसे ।।**



भगवान शिवाने विषाला शांत करण्यासाठी राम नामरुपी औषध घेतले आणि ते विषाच्या दाहकतेपासून मुक्त झाले. संत एकनाथ महाराज देखील म्हणतात...

**नाम पाठ जपे भोळा महादेव । देवाधिदेव वंदी तया ।।**
**विष ते अमृत नामा पाठी झाले । दैन्य दुःख गेले नाम जपता ।।**

भगवान शंकर नाम जपतात म्हणून सर्व देवता त्यांना वंदन करतात. नाम जपल्याने विष अमृतामध्ये परिवर्तीत झाले व सर्व दैन्य दुःखापासून ते मुक्त झाले.

भगवान शिव नामाची महिमा जाणतात इतकेच नव्हे तर इतरांनाही सांगतात. जसे संत रामदास स्वामी म्हणतात.....

**जगी धन्य वाराणसी पुण्यरासी । तयेमाजी जाता गती पूर्वजांसी ।**
**मुखे रामनामावली नित्य काळी ।जीवा हीत सांगे सदा चंद्रमौळी ।।**

या जगामध्ये एक असे पुण्यरासी क्षेत्र आहे ते म्हणजे वाराणसी म्हणजेच काशी. जो काशीला जातो त्याचा तर उद्धार होतोच, परंतु त्यांच्या पूर्वजांचा देखील उद्धार होतो. त्या मुक्तीदाता काशी क्षेत्रात भगवान शंकर राम हा तारक मंत्र जीवाला देतात त्यामुळे जीव मुक्त होऊन जातो.

भगवान शंकर रात्रंदिवस रामनामाचा जप करतात, स्मरण करतात. असे ऐकून बरेचसे भक्तज़न राम नामस्मरण तर करत नाही उलट वादविवाद करत राहतात. ते शिव भक्तांना म्हणतात तुमचे शिव लहान आहे आणि आमचे राम मोठे आहे कारण शिव

आमच्या रामाचे नामस्मरण करतात. असे ऐकल्यानंतर आता शिव भक्त शांत थोडेच बसणार आहे, ते म्हणतात की, असे नाही भगवान शिव तर सर्व देवांचे देव महादेव आहे, ते लहान कसे असू शकतात? अशा प्रकारे कोणी रामाला तर कोणी शिवाला लहान मोठा मानतात व मानवायला लावण्याच्या हेतूने वाद विवादच नव्हे, तर कधी कधी मारामारीची पाळी येते. असे तेच लोक करतात ज्यांनी कधी रामाला पाहिले नाही व शिवालाही पाहिले नाही. परंतु ज्यांनी रामाला व शिवाला पाहिले किंवा रामतत्त्व, शिवतत्त्व ज्यांनी जाणले ते आपल्या अनुभवाने सांगतात की, हरी आणि हर एकच आहे. हरी आणि हर दोन्ही एकच आहे तर ते दोन का बनले? असा प्रश्न काहींच्या मनात निर्माण होऊ शकतो. त्याच्या उत्तरासाठी ज्ञानी म्हणतात.

**हरिहर एक रुप गुण शिला । करत स्वामी सेवककी लीला ।।**
**रहते दोहू पुजत पुजवावत । पुजा पद्धती सबन्ही सिखावत ।।**
**मारुती बन हरी सेवा किन्ही । रामेश्वर बन सेवा लिन्ही ।।**

हारी आणि हर दोन्ही एकच आहे. एकच असतांना ते दोन यासाठी झाले, स्वामी आणि सेवक यासाठी बनले की, पुजापद्धती सर्व जगाला समजली पाहिजे. जसे भगवान शंकराने मारुती बनून हरिची म्हणजेच रामाची सेवा केली आणि रामेश्वर रामाचा ईश्वर बनून सेवा ही ग्रहण केली. पुजा सेवा कशी केली पाहिजे. नामस्मरण कसे केले पाहिजे हे शिकविण्यासाठीच ते अवतरित होतात. लीला करतात. भगवान शिव राम मंत्र जपतात आणि राम भगवान शिवाच्या मंत्राचा जप करतात. मंत्राचा, नामाचा, भक्तीचा महिमा जगाला दाखविण्यासाठी ते दोन बनलेले आहे. अन्यथा ते दोन्ही एकच आहे. जसे संत नामदेव



महाराज म्हणतात....

**शिव विष्णू दोघे एकची अवतार । वेदांनी निर्धार हाची केला ।।**
**नामा म्हणे येथे दुजा नको भाव । विष्णू तोचि शिव शिव विष्णू ।।**

शिव आणि विष्णू दोघे एकच आहे. भगवान शिवाने राम नामाचा महिमा, भक्तीचा महिमा, जगाला दाखविण्यासाठी हनुमंताचा अवतार घेतला. म्हणून संत तुकाराम महाराजांनी वाल्मिक, भगवान शंकर, माता पार्वतीच्या म्हणजेच उमेच्या नंतर हनुमंताचे नाव घेतले की, नामाचा महिमा हनुमंत जाणतात.

**नाम जाणे हनुमंत ।**

हनुमंत नामाचा महिमा जाणतात. येथे मनामध्ये प्रश्न निर्माण होऊ शकतो की, हनुमंत नामाचा महिमा कसे काय जाणतात? तर रामायणामध्ये कथा येते की, हनुमंत सीतेचा शोध करण्यासाठी लंकेमध्ये गेले, सीतेचा शोध लागल्यानंतर हनुमंताने रावणाला नितीचा बोध दिला. तो ऐकल्यानंतर अभिमानी रावणाने हनुमंताचा उपकार तर मानला नाही उलट हनुमंताचा नाश करण्याचा प्रयत्न केला. कपडे तेला तुपामध्ये भिजवून हनुमंताच्या पुच्छाला बांधून दिले. आणि अग्नी लावून दिला. अग्नी लावताच हनुमंताने उडी मारली आणि लंकेमध्ये फिरायला लागले. लंका जळून गेली. परंतु हनुमंताला काहीच झाले नाही. याचे कारण काय? तर संत नामदेव महाराज म्हणतात.....

**अग्री जाळी तरी न जळे हनुमंत । हृदयी सीताकांत म्हणोनिया ।।**

हनुमंताच्या हृदयामध्ये सीताकांत म्हणजेच रामाचे स्मरण आणि मुखात रामनाम असल्यामुळे अग्री त्यांना जाळू शकला नाही. जसा प्रल्हादावरतीही अग्रिचा काही प्रभाव झाला नाही. कारण तो देखील भगवंताचे नामस्मरण करत होता.

वाल्मिक, भगवान शंकर, उमा, हनुमंताच्या नंतर
संत तुकाराम महाराज म्हणतात.....

**जाणताती महासंत**

जे महान संत आहे, भक्त आहे ते नामाचा महिमा जाणतात. जे महान संत आहे ते नामस्मरण करतात. भलेही कोणी शिव, राम, कृष्ण, विठ्ठल किंवा इतर देव देवतांचे नाम जपत असेल परंतु नाम जपल्यानंतर ते आपला अनुभव सांगतात की, नामाची महिमा अनमोल आहे. म्हणून ते स्वतः जपतात आणि इतरांनाही म्हणतात की, आपण देखील नाम जप करा. कारण..

**नाम की महिमा है अनमोल ।।धृ।।**
**शिव शंकर शिव शंकर शिव शंकर बोल ।**
**हर हर हर हर महादेव बोल ।**
**सीताराम सीताराम सीताराम बोल ।**
**राधेश्याम राधेश्याम राधेश्याम बोल ।**
**विठ्ठल विठ्ठल विठ्ठल बोल ।**

या पैकी एखादे किंवा सर्व नाम जपा. नामाची महिमा अनमोल आहे.



कारण...

**नाम प्रभू का है सुखकारी । पाप कटेंगे क्षण में भारी**
**ना लगता कछू मोल ।।१।।**

भगवंताचे नाम सुख देणारे आहे, आणि सर्व पापाला क्षणात म्हणजे याच जन्मात नाहिसे करणारे आहे. पाप नाश करणारे भगवंताचे नाम घेण्यासाठी काहीच मोल म्हणजे पैसा लागत नाही. फक्त श्रद्धा - भावना पाहिजे. नामाचा अजून काय महिमा आहे याच्या संदर्भात म्हणतात...

**शबरी अहिल्या सजन कसाई । नाम जपन से ही मुक्ती पाई**
**जीवन का हर क्षण है अनमोल ।।२।।**

शबरी, अहिल्या, सजन कसाई इत्यादींची नाम जपानेच मुवती झाली. जीवनाचा प्रत्येक क्षण अनमोल आहे म्हणून प्रत्येक क्षणी मुक्तीसाठी भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे. येथे एक शंका मनामध्ये निर्माण होऊ शकते की, शबरी, अहिल्याचा उद्धार होणे स्वाभाविक आहे. परंतु सजन कसायाचा उद्धार होणे कसे काय शक्य आहे? कारण कसाई तर हिंसा करत राहतात.

**अहिंसा परमो धर्म**
**दया धर्म का मूल है**

असे वचन आहे म्हणून सजन कसायाची मुक्ती कशी शक्य आहे? जर सजन कसायाची मुक्ती नाम जपामुळे झाली तर ती कशी झाली? सजन कसाई काय करत होता? असे कित्येक प्रश्न मनामध्ये निर्माण होऊ शकतात.या प्रश्नाच्या उत्तरासाठी सजन कसायाची कथा श्रवण केली पाहिजे. सजन कसायाची कथा संत या प्रमाणे सांगतात.

एका गावात सजन कसाई राहत होता. तो भलेही कसायाच्या घरी जन्माला आला होता. परंतू भगवद्भक्त होता. आई-वडिलांची सेवा करायला पाहिजे म्हणून तो आपला जन्मजात धंदा करत होता. परंतु इतर कसायाप्रमाणे तो हिंसा करत नव्हता. दुसऱ्याने जे बकरे कापले असेल ते आनून तो ते विकून आपला धंदा चालवत होता. भलेही तो हिंसा करत नव्हता. परंतु मांसाचा धंदा करणे त्याला चांगले वाटत नव्हते. एक दिवस त्याने तो धंदा देखील सोडून दिला आणि जगन्नाथ धामाची यात्रा करण्यासाठी तो घर सोडून निघाला. एक दिवस यात्रा करतांना एका गावाच्या बाहेर एक घर होते. रात्र झाल्यामुळे विश्राम करण्यासाठी तो त्या घरी थांबला. त्या घरात केवळ पती-पत्नी दोघेच राहत होते. रात्रीचे बारा वाजता त्या घरची स्त्री सजन कसायाजवळ आली व आपली इच्छा पूर्ण करण्याची विनंती सजन कसायाला करायला लागली. सजन कसायाने नकार दिल्यानंतर त्या स्त्रिला वाटले की हा आपल्या पतीच्या भयामुळे आपली इच्छा पूर्ण करत नाही त्यामुळे ती सजन कसायाला म्हणाली की, माझ्या पतीच्या भयामुळे भयभीत असाल तर मी आत्ता माझ्या पतीचा बंदोबस्त करते. असे म्हणत लगेच तिने एक कोयता हातात घेतला व एकाच घावात आपल्या झोपलेल्या पतीचे शिर धडाच्या वेगळे केले.

हे सर्व केल्यानंतर देखील त्या स्त्रिने बघितले की आपली इच्छा हा पुरुष पूर्ण करत नाही, तेव्हा त्या स्त्रिने रडायला सुरुवात केली.



लोक आले, तेव्हा तिने सांगितले की, माझी इच्छा करून या व्यवतीने माझ्या पतीची हत्या केली. सजन कसायाला न्यायधीशा समक्ष उपस्थित करण्यात आले. न्यायाधिशाने त्याचे दोन्ही हात तोडण्याचा आदेश दिला. त्याचे दोन्ही हात तोडल्यानंतर त्याला सोडून देण्यात आले.

हात तोडल्यानंतर देखील त्याने भगवंताचे नाम घेणे सोडले नाही. जगन्नाथ धामाचे दर्शन घेण्यासाठी तो नामस्मरण करत चालायला लागला. काही अंतर चालून गेल्यानंतर त्याने बघितले की एक पालखी काही लोक घेवून येत आहे. त्या लोकांनी सांगितले की जगन्नाथ भगवंताच्या आदेशाप्रमाणे आम्ही आलेलो आहोत. कारण की, भगवंताने आम्हाला स्वप्नात आदेश दिलेला आहे की, माझा एक भक्त ज्याचे हात तुटलेले आहे तो माझ्याकडे येत आहे. त्याला पालखीत बसवून घेवून या. म्हणून आम्ही आलो आहोत. भगवंताचा आदेश मानून सजन कसाई त्या पालखीत बसून जगन्नाथ धामामध्ये पोहचला. त्या ठिकाणी नामसकीर्तन चालू होते. त्यामध्ये सजन कसाई देखील सामील झाला. त्या नामसंकीर्तनामध्ये इतका दंग झाला की तो आपले देहभान देखील विसरून गेला. नामसंकीर्तन करविणाऱ्याने हात उंच करून टाळया वाजविण्यास सर्वांना सांगितले. सजन कसाई देखील टाळया वाजवायला लागला. तो हे विसरून गेला की माझे हात तुटलेले आहे, ज्या वेळेस नामसंकीर्तन बंद झाले, त्या वेळेस सजन कसायाने बघितले की त्याचे हात पहिल्यासारखे झालेले आहे.

नामसंकीर्तनाचा महिमा सजन कसायाने जाणला. परंतु मनात संदेह राहिला की, माझा काहिही अपराध नसतांना माझे हात का तोडण्यात आले? तेव्हा रात्री स्वप्नामध्ये बघितले की, सजन

कसाई पूर्व जन्मात काशीमध्ये ब्राह्मण होता. एक गाय कसायाच्या हातातून सुटली. कसाई सुरा घेऊन तिच्या पाठीमागे पळायला लागला हे त्या ब्राह्मणाने बघितले की, हा कसाई आहे, गायीची हत्या करण्यासाठी तिच्या पाठीमागे लागलेला आहे. असे कळून देखील कसायाने गायीला धरायला सांगितल्यानंतर त्या ब्राह्मणाने दोन्ही हाताने गाईच्या गळयाला पकडले. कसाई आला व त्याने त्या गायीची हत्या केली. ब्राह्मण असतांना देखील आपल्या हाताने गायीला धरून गायीची हत्या करण्यासाठी नकळत त्या ब्राह्मणाने मदत केली म्हणून तोच ब्राह्मण दुसऱ्या जन्मात सजन कसाई झाला. ती गाय स्त्री झाली आणि गायीला मारणारा तो कसाई तिचा पती झाला. पूर्वजन्मामध्ये ज्या कसायाने गायीला मारले होते, त्याच गायीने म्हणजेच आता स्त्री बनलेल्या गायीने कसायाला म्हणजेच आपल्या पतिला एकाच घावात मारले, अशा प्रकारे सजन कसायाने जाणले की, भक्तीच्या अभावामुळे कापाकापी सुरू आहे. मी भगवंताचे नाम जपले त्यामुळे अपराधाबद्दल अल्पदंड मिळून मी त्या पापापासून लवकर सुटलो म्हणून. ज्यांना भवसागरातून तरायचे असेल तर त्यांनी काय केले पाहिजे? यासाठी सांगतात...

**जो चाहे भवसागर से तरना ।जीवन मरन को है मिटाना ।**
**पाप की गठरी मन से खोल ।।**

ज्याला भवसागरातून तरायचे असेल, जन्ममृत्यूच्या चक्रापासून निवृत्त व्हायचे असेल त्यांनी नामस्मरण तर केलेच पाहिजे. परंतु सर्वांत पहिले पाप करण्याची भावना मनातून काढून टाकली पाहिजे.



**दुनिया का है झुठा धंदा ।समझता है कोई गुरु का बन्दा ।**
**समझले नाम का मोल ।।**

हा सर्व संसार असत्य आहे, मिथ्या आहे, क्षणभंगूर आहे, दुःखरुप आहे, स्वप्नवत आहे, असे कोणी विरळा ही गुरुचा शिष्य हे सर्व समजतो आणि नामस्मरणाचा महिमा जाणतो. जसे संत तुकाराम महाराजांना शरण गेलेली त्यांची शिष्या संत बहेणाबाई नाममहिम्याच्या संदर्भात दूसऱ्या चरणामध्ये म्हणते.....

**करिल मनीचे परिपूर्ण हेत । पाहिजे हे चित्त नामापासी ।।**

मनाची संपूर्ण शुभ इच्छा नाम जपल्याने पूर्ण होऊन जाते. परंतू त्यासाठी आपले चित्त नामापासी असले पाहिजे. शरीराने भलेही मंदिरात रहा किंवा घरात रहा, परंतू भगवंताचे चिंतन नेहमी केले पाहिजे म्हणून संत सेना महाराज म्हणतात...

**असाल तेथे करा नामाचे चिंतन । याहून साधन आणिक नाही ।।**
**सोडविल माझा भक्तांचा कैवारी । प्रतिज्ञा निर्धारी केली आम्ही ।।**

आपण कोठेही रहा, परंतु तेथे भगवंताचे चिंतन करा. यासारखे चांगले साधन कोणतेच नाही. भगवंताचे आपण चिंतन करत असाल आणि आपल्यावर काही संकट आले तर भगवंत निश्चीत त्या संकटापासून सोडविल, असे आम्ही प्रतिज्ञापूर्वक सांगतो. म्हणजेच " प्रतिज्ञा निर्धारी केली आम्ही " या ठिकाणी संतांचा नामावर किती दृढ विश्वास आहे, हे लक्षात घेण्यासारखे आहे. कारण संत म्हणतात हे आम्ही प्रतिज्ञापूर्वक सांगत आहे. खरे म्हणजे संत प्रतिज्ञा करत नाही. संतांनी प्रतिज्ञा करू नये. भविष्य सांगत बसू नये. एवढेच नव्हे तर निश्चयात्मक बोलू नये. असे काही ज्ञानी महापुरुष सांगतात.

काही म्हणतील की, का सांगू नये? याचे उत्तर तर अगदी

सहज देण्यासारखे आहे. मला सर्व कळते असे जर कुणी संत म्हणेल तर मला भगवंताची प्राप्ती होईल किंवा नाही असे विचारणारे क्वचितच सापडतील. परंतु माझी म्हैस हरवली, कुठे सापडेल? माझी पत्नी कुठे गेली? माझे पती परदेशात राहतात, ते काय करत असतील आपण थोडे ध्यान करुन बघा. या सारखे प्रश्न विचारणारेच जास्त असतात म्हणून मला कळते, मला समजते, असे चुकून देखील म्हणू नये. असे महापुरुष म्हणतात. भविष्य सांगितले तर अनर्थच जास्त होण्याची संभावना असते. जसे...

एका संताला एका स्त्रीने विचारले की, महाराज माझे पती सैनिक आहे. बऱ्याच दिवसापासून त्यांचा समाचार नाही. घरी केव्हा येतील? संताने सांगितले सातव्या दिवसी येतील. त्याप्रमाणे संत वचनावर विश्वास ठेवून त्या स्त्रीने पतिच्या स्वागताची सर्व तयारी केली. वस्त्रअलंकाराने सजून ती सातव्या दिवसी पतीच्या स्वागतासाठी तयार झाली. खरोखरच त्या दिवशी तिचा पती देखील आला.

परंतु तिला बघून पतीचा क्रोध अनावर झाला, त्याने विचारले हे सर्व नवे कपडे, दागिने तू परीधान केले, ते कुणाला प्रसन्न करण्यासाठी? पत्नीने सांगितले आपणालाच प्रसन्न करण्यासाठी. तेव्हा पतीने परत विचारले, हे तुला कसे समजले की मी आज येणार आहे? त्या वेळेस ती स्त्री म्हणाली की, मला संताने सांगितले.त्या वेळेस त्या सैनिकाने संताला प्रश्न विचारला आपणाला सर्व कळते? हो म्हणण्याशिवाय संताला आता दुसरा पर्याय नव्हता. संत म्हणाले हो कळते! त्याच वेळेस त्या सैनिकाने विचारले आपणाला सर्व कळते तर सांगा या माझ्या गर्भवती घोडीला नर होणार आहे की मादी.संताने सांगितले 'नर ' त्याच क्षणी त्या सैनिकाने तलवारीने घोडीचे पोट फाडले व बघितले तर खरोखर पिलू नरच होते. संताने ती हत्या बघितली.



माझ्यामुळे हे झाले, असे समजून त्यांनी प्रायश्चित घेण्यासाठी देह त्याग केला. हे ज्या वेळेस त्या स्त्रीला कळाले, की माझ्यामुळे संतांनी देह त्याग केला, त्या वेळेस त्या स्त्रीने गळफास घेऊन आत्महत्या केली. घोडी, तिचे पिलू, संत, पत्नी यांच्या प्राणनाशाला मीच कारणीभूत आहे असे समजून त्या सैनिकाने देखील आत्महत्या केली. म्हणून म्हणतात की, भविष्य सांगू नये, निश्चयात्मक बोलू नये. हे सर्व माहीत असतांना देखील जगाच्या कल्याणासाठी संत प्रतिज्ञा करतात.

**सोडविल माझा भक्तांचा कैवारी । प्रतिज्ञा निर्धारी केली आम्ही**

म्हणून लक्षात ठेवले पाहिजे की, जसे द्रोपदीला, गजेंद्राला, प्रल्हादाला संकटापासून सोडविले तसेच आपणाला देखील सोडविल. पूर्वी भगवंत सोडवत होता, आता सोडवित नाही असे नाही. आता देखील सोडवितो आणि भविष्यकाळात देखील सोडवित राहील.

एक आत्ता आत्ता घडलेली घटना. अयोध्येजवळ एक संत होऊन गेले. त्यांनी आपल्या बालपणीची एक घटना सांगितली.

उन्हाळ्याचे दिवस होते. आई आपल्या मुलाला हनुमंताची कथा सांगत होती. घराच्यासमोर अंगणात आई आणि मुलगा दोघेच बसलेले होते. मुलाचे वडील गावाला गेले होते. रात्रीचे जवळपास १२ वाजत आले होते. आई मुलाला सांगत होती, बाळ हनुमंत महान उपकारी आहे तो संकट समयी धाऊन येतो व भक्तांचे रक्षण करतो. हनुमंत सीतेचा शोध करण्यासाठी लंकेत गेले. त्यांनी सीतेचा शोध लावला व रावणाला सद्उपदेश केला. परंतु अभिमानी रावणाने तो उपदेश ऐकून हनुमंताचे आभार तर मानले नाही. उलट तेलतुपात कपडे भिजवून हनुमंताच्या शेपटीला गुंडाळून हनुमंताला जाळण्याचा प्रयत्न केला. परंतु हनुमंताच्या मुखात नाम असल्यामुळे हनुमंताला

काहीही झाले नाही. हनुमंताच्या शेपटीला अग्नी लावल्यानंतर हनुमंताने लंका जाळायला सुरुवात केली. लंका जाळायला सुरुवात केली हा शब्द आईने उच्चारला व कथा सांगणे बंद पडली, कारण आईने समोर बघितले तर १०-१५ चोर लाठ्या, काठ्या घेतलेले आईला दिसले, त्यामुळे आई भयभित झाली. आईची बोबडी वळली, कथा बंद पडली. आईची ही अवस्था बघून मुलगा म्हणाला ''आई तू हनुमंताला बोलव.'' परंतु आई तर अत्यंत भयभित झाली होती. शेवटी तो मुलगाच म्हणाला, ''हे हनुमंता! ती लंका नंतर जाळा, पहिले इकडे या.'' आणि या म्हणताच तेथे एक भला मोठा वानर आला. चोरांच्या लाठ्या, काठ्या वर होईपर्यंत तर त्या वानराच्या माराने सर्व घायाळ झाले सर्व ओरडत पळायला लागले. त्यांच्या ओरडल्याने शेजारी सर्व गोळा झाले काय झाले. म्हणून विचारले तेव्हा घडलेला प्रकार आईने सांगितला. तेव्हा त्या सर्वांनी अनुभवले की, तेथे एक दिव्य सुगंध पसरलेला आहे. तेव्हा सर्वांची खात्री झाली की, वानराच्या रुपाने साक्षात तेथे हनुमंत येऊन गेले. त्यामुळेच संत निश्चयपूर्वक म्हणतात......

**सोडविल माझा भक्तांचा कैवारी । प्रतिज्ञा निर्धारी केली आम्ही ।।**

भगवंत कोणत्यातरी रुपात येतो आणि संकटापासून भक्ताला सोडवितो तसेच भक्तांची सर्व मनोकामना पूर्ण करतो. ऐवढेच नव्हे तर अभंगाच्या तिसऱ्या चरणामध्ये संत बहिणाबाई म्हणते...

**भुक्ती आणि मुक्ती जोडतिल सिद्धी । होईल गा बुद्धी अपरिमीत।।**

भुक्ती-मुक्ती, रिद्धी-सिद्धीची नाम जपल्याने प्राप्ती होते. त्याच



प्रमाणे तर अपरिमीत बुद्धी प्राप्त होते. एवढेच नव्हे तर जसे हनुमंताने नाम जपले म्हणून....

**अष्ट सिद्धी नव निधीके दाता । अस वर दीन्ह जानकी माता ।।**

जानकी मातेने अष्ट सिद्धी नव निधी प्राप्त होतील, असे वरदान दिले. जो नाम जपतो त्याला केवळ रिद्धी, सिद्धी, निधी, बुद्धीच मिळते असे नव्हे, तर संत बहेणाबाई अभंगाच्या शेवटच्या चरणामध्ये म्हणते...

**बहेणी म्हणे पाहा जपोनिया नाम । पुरविल काम जो जो हेत ।।**

आपल्या अनुभवाने, स्वानुभवाने संत बहेणाबाई म्हणते की, आम्ही नाम जपले आमच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या, तशाच तुमच्याही सर्व इच्छा पूर्ण होतील. त्यासाठी आपण देखील नाम जपा.

आपल्या सर्व इच्छा पूर्ण होतील यासाठी आपण देखील नाम जपून बघा, असे सांगितल्यानंतर बरेच जण असे म्हणतात की, आम्ही तर पुष्कळ नाम जपतो, परंतु आमची तर एकही इच्छा पूर्ण होत नाही. याचे कारण काय? नाम जपूनही आपल्या इच्छा पूर्ण होत नसेल तर त्याची अनेक कारणे आहेत, त्या पैकी काही कारणे या प्रमाणे सांगता येतील.जसे सुरुवातीलाच सांगितले की,

**भांग तंबाखू छूतरा कबीर जे जण खाई ।**
**जोग जग्य जप तप किये सबै रसातल जाई ।।**

किर्तीही नाम जपत असेल परंतु व्यसने करत असेल अशुद्ध आहार म्हणजेच मांसाहार करत असेल तर जपाच, तपाच, यज्ञाच, होम-हवनाच, अनुष्ठानाच काहीच फळ मिळत नाही. हे सर्व कर्मे निष्फळ होतात. म्हणून सर्वांत पहिले व्यसने करणे व मांसाहार सोडला पाहिजे.दुसरे कारण म्हणजे ज्ञानी म्हणतात.....

**राम नाम तो सब कोई लिवै । ठक ठाकूर और चोर ।**
**जीस नामसे ध्रुव प्रल्हाद तर गये । वो नाम कुछ और ।।**

ध्रुव-प्रल्हाद, लहान लहान बालके होती, परंतु त्या बालकांनी ज्या श्रद्धेने, भावनेने नाम जपले त्याच श्रद्धेने, भावनेने नाम जपले पाहिजे.तिसरे कारण म्हणजे संत नामदेव महाराज म्हणतात....

**सद्‌गुरू वाचोनि नाम नये हाता ।साधन साधिता कोटी गुणे ।।**
**जैसे कांतेविन करणे संसार । तैसा हा व्यापार साधनाचा ।।**
**नामदेव म्हणे सद्‌गुरु पासोनी । नाम घ्या जाणोनी नाना काही ।।**

नामदेव महाराजांनी आपल्या स्वतःच्या स्वानुभवाने अत्यंत सुंदर उदाहरण दिले की, जसा पत्नीशिवाय संसार होऊ शकत नाही म्हणजेच पत्नीशिवाय जसे मुलेबाळे होऊ शकत नाही. तसा सद्‌गुरुशिवाय परमार्थ होऊ शकत नाही. सद्‌गुरूच्या मुखाने सिद्ध केलेला मंत्र जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत आपल्या मुखाने किंवा गुरु मुखाने घेतलेल्या मंत्राला विशेष महत्त्व नाही. स्वतःच्या मनाने जपलेल्या किंवा गुरुच्या मुखाने घेतलेल्या मंत्राला विशेष महत्त्व नाही कारण...



**मंत्र तंत्र उपदेशिते । घरोघरी गुरु आहेत आईते ।**
**जो शिष्यासी मेळवी सद्‌वस्तूते । सद्‌गुरू त्याते श्रीकृष्ण मानी ।।**

मंत्र, तंत्राचा उपदेश करणारे गुरू तर घरोघरी आईते आहेत. परंतु सद्‌गुरु अत्यंत दुर्लभ आहे. म्हणून भगवान श्रीकृष्ण देखील म्हणतात गुरूपासून नव्हे तर सद्‌गुरूपासून नाम किंवा मंत्र घेतला पाहिजे. तो जपला पाहिजे. गुरु आणि सद्‌गुरू कुणाला म्हणतात गुरु आणि सद्‌गुरुचे लक्षणे काय आहे? हे तर नंतरच्या स्वतंत्र प्रवचनात आपणास कळेलच. परंतु येथे थोडक्यात लक्षात ठेवा सद्‌गुरू म्हणजे

**जेथे ज्ञान वैराग्य भक्ती ठसावे । क्षमा शांती देही दया हे विसावे ।**
**दिसे ब्रह्मचर्य स्वअंगासी आले । म्हणे बहेणी तो सद्‌गुरु स्वभावे ।।**

सद्‌गुरुचे थोडक्यात लक्षणे संत बहेणाबाई सांगते की, ज्ञान, वैराग्य आणि भक्ती ज्यांच्या मनात ठासून भरली असेल. क्षमा शांती आणि दया ज्यांच्या जवळ कायमची वसली असेल आणि जो ब्रह्माचारी असेल. म्हणजेच ब्रह्मआचरती तो ब्रह्मचारी. ज्यांनी ब्रह्याला जाणले असेल ज्यांची ब्रह्मरूप दृष्टी झाली असेल अशा सद्‌गुरुचा कृपानुग्रह घेतला पाहिजे.

सद्‌गुरूपासून नाम किंवा मंत्र घेतल्यानंतर तो रात्रंदिवस जपला पाहिजे आणि लक्षात ठेवले पाहिजे

**शिव शंकर शिव शंकर शिव शंकर कहिये ।**
**जाहि बिधी राखे शिव ताही बिधी रहिये ।। धृ ।।**

भगवंताचे नाम घ्या, परंतु भगवंताकडे काही मागू नका. जसे परमात्मा ठेवील तसे रहा...

**ठेविले अनंते तैसेची रहावे । चित्त असू द्यावे समाधान ।।**
आपली चित्तवृत्ती समाधानी ठेवा आणि

**मुख मे हो शिवनाम शिव सेवा हाथ मे ।**
**तु अकेला नाही प्यारे, शिव तेरे साथ में ।**
**विधी का विधान जान हानि लाभ साहिये ।। १ ।।**

आपल्या मुखामध्ये नेहमी सद्‌गुरुने दिलेले आपल्या इष्ट देवतेचे नाम पाहिजे. **''जीवसेवा हीच ईश्वर सेवा ''** या भावनेने रात्रंदिवस सेवा केली पाहिजे. ज्याचा सखा हरि त्यावरी विश्व कृपा करी. कार्य करतांना सेवा करतांना आपण एकटे नाही तर भगवंत आपल्या सोबत आहे ही भावना नेहमी ध्यानात ठेवली पाहिजे. विधीच्या विधानाप्रमाणे जो काय हानी लाभ होईल तो सम भावनेने स्वीकार केला पाहिजे. अशी भावना ठेवली तर निश्चीत आपले कार्य सफल होईल. परंतु अशा वेळेस माझ्यामुळे हे कार्य झाले, अशी भावना मनात चुकून देखील आणू नये. मी केले म्हणून कार्य झाले असा अभिमान मनात आणला तर...

**किया अभिमान तो फिर मान नही पायेगा ।**
**होगा प्यारे वही जो शिवजी को भायेगा ।**
**फल आशा त्याग शुभ काम करते रहिये ।।२।।**

जो अभिमान करतो त्याला मान सन्मान मिळत नाही. निराभिमानी होऊन कार्य केले पाहिजे. आपण कोणतेही कार्य अरंभिले तरी तेच



कार्य सफल होईल जे भगवंताला मान्य असेल. म्हणून कोणतीही आशा मनात न ठेवता शुभ कार्य करत राहिले पाहिजे.

**जिंदगी की डोर सोप हाथ दिनानाथ के ।**
**महलो मे राखे चाहे झोपडी मे बास दे ।**
**धन्यवाद निर्विवाद शिव नाम कहिये ।।३।।**

जीवनाचा सर्व भार भगवंतावर सोपविला पाहिजे. मग भगवंत महलामध्ये ठेवो की, झोपडीमध्ये ठेवो. त्यामध्ये समाधानी राहिले पाहिजे. जर आपली अशी भावना असेल तर भगवंत आपणाला झोपडी न देता महाल देईल. सुदाम देवाने महालाची इच्छा केली नव्हती. परंतु भगवंताने सुदामालाच नव्हे, तर त्याच्या सानिध्यात राहणाऱ्याला सुवर्ण महाल दिला, जसे संत सांगतात.

सुदामा ब्राह्मण गरीब होता भगवंताला भेटण्यासाठी जायचे तर भगवंताला देण्यासाठी देखील काही नव्हते, म्हणून दुसऱ्याकडून उसने पोहे आणले व ते भगवंताला दिले. तर भगवंताने पोह्यासाठी सोन्याचा गाव दिला. जशी आपली द्वारकापुरी तशी सुदामाला सुवर्णाची सुदामपुरी दिली. फरक ऐवढा ठेवला की, आपली द्वारकापुरी निजधामाला जांताना समुद्रात बुडवून टाकली, परंतु सुदामाची सुदामपुरी तसीच ठेवली.जसे सुदामाने काहीही मागितले नाही, तरी त्यांना सुदामपुरी दिली. तसेच पाडवांनी भगवतांकडे काहीच मागितले नाही. तरी त्यांचा रथ चालवून त्यांना युद्धाला प्रवृत्त करून त्यांना जय प्राप्त करून दिला. राज्य प्राप्त करून दिले व मृत्यूनंतर स्वर्ग दिला.

पांडवांनी, सुदामाने भगवंताकडे काहीच मागितले नव्हते.

**ठेविले अनंते तैसेची रहावे । चित्त असो द्यावे समाधान**

या वृत्तीने राहून भगवंताचे नामस्मरण ते करत होते. संत तुकाराम महाराज म्हणतात.......

**पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवासी आठविती ।।**
**सुदामा ब्राह्मण दारिद्र्ये पिडीला । नाही विसरला पाडुरंग ।।**
**तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर जाले तरी ।।**

भगवंताला ते विसरले नाही त्यामुळे भगवंताने त्यांना ज्या भोगऐश्वर्याची इच्छा नव्हती ते सर्व प्राप्त करून दिले. म्हणून जे आवश्यक असेल ते सर्व भगवंत आपणास देईल. फक्त त्यासाठी जसे सांगितले

**जिंदगी की डोर सोप हाथ दिनानाथ के ।**
**महलो में राखे चाहे झोपडी मे बास दे ।**
**धन्यवाद निर्विवाद शिव नाम कहीए ।।४।।**

भगवंत जसे ठेवील तसे राहा. कर्म देखील करत रहा फक्त कसलीही अपेक्षा करू नका. आणि आशा करायचीच असेल तर ...

**आशा एक शिव जीसे दुजी आशा छोड दे ।**
**नाता एक शिव जीसे दुजा नाता तोड दे ।**
**साधू संग शिव संग अंग अंग रंगिये ।।५।।**

फक्त भगवंताच्या भक्तीची भगवंताच्या प्राप्तीची इच्छा करायची. मी भगवंताचा आहे व भगवंत माझा आहे, हेच नाते दृढ करायचे. सज्जनाच्या संताच्या संगतीत राहायचे असा मनाचा दृढ निग्रह करायचा. भगवंताकडे काहीही मागायचे नाही आणि मागायचेच असेल तर एकच मागा की हे प्रभू...



**संताची संगती नामाची आवडी । रिकामी अर्धघडी जाऊ नेदी ।।**

संताची संगती जीवनात मिळाली पाहिजे. आणि रात्रंदिवस कर्तव्य कर्म करत तुझे नाम आमच्या मुखात आले पाहिजे.

म्हणून प्रभू अशी कृपा कर...

अब प्रभू कृपा करहू यही भाँती । सब तजी भजन करहू दिन राती ।।
जयती शिवा शिव जानकी राम । गौरी शंकर सीता राम ।।
जय रघुनंदन जय सीयाराम। ब्रज गोपी प्रिय राधेश्याम ।।
रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ।।
श्रीराम जय राम जय जय राम । जय महारूद्र जय हनुमान ।।
विठ्ठल विठ्ठल पंढरीनाथ । जय शिव शंकर भोलेनाथ ।।
दुर्गती नाशिनी दुर्गा माँ । काल विनाशिनी काली माँ ।।
आदि शक्ती भवानी माँ । भव भय भंगसी भांगसी माँ ।।

ॐ नमः पारबती पतये हर हर महादेव
गोपाल कृष्ण भगवान की जय
श्री गुरूदेव दत्त दत्त दत्त अलख निरंजन
सद्‌गुरु जनार्दन स्वामी महाराज की जय
महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज की जय

❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖

## स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन

# पुस्तके, व्ही.सी.डी.

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळा पासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्गुरु वचनामृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |